
# *NUTAN VIDARBHA SHIKSHAN MANDAL'S*
# *MAHILA MAHAVIDYALAYA Amravati.*




# COMMERCE DEPARTMENT

## CRITERIA NO 2.5

## STUDENT SUPPORT &PROGRESSIONREPORT (2016-17)



**Prof. Dr. ShaliniPande**

- प्रवेश
- कार्यभार (Workload)
- वेळापत्रक ( Time Table)

### 2.3.1 Promotion of Research

- One Major Research project Proposal Submit to ICSSR

Subject : “ Impact of Government Post Matric Scholarship Scheme on tribal student’s special effect on Melghat area Dist. Amravati.”

### 2.3.7 Collaboration

- PPT सादरीकरण स्पर्धा
- ई-कॉमर्स व कॉमर्स वरील आंतरमहाविद्यालयीन सेमिनार मध्ये सहभाग

### 2.5.2 Student Progression

- निकाल
- Slow Learner & Advance Learner Student करिता Extra Coaching

### 2.5.3 Student Participation and Activities

- अभ्यासमंडळ उदघाटन कार्यक्रम -व्याख्यान - बदलती संस्कृती
- महाविद्यालयातील विविध विभागा अंतर्गत प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन
- SEBI कडून आर्थिकशिक्षण व जागृती कार्यशाळेचे आयोजन

### 2.5.1 Student Support

- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर सेमिनार
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर एकदिवसीय कार्यशाळा
- Industrial Accounting वर सेमिनार
- ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग वर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन
- Interview Technique & Resume Making वर कार्यशाळा
- सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन
- करिअर कौन्सिलिंग ( अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींकरिता )

### 2.7 Innovation & Best Practice

- Scrap Book Project ( अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींकरिता )

### 2.7 Training Program & Job Opportunity

- एल. आय. सी. व म्युच्युअल फंड गुंतवणूक अभिकर्ते प्रशिक्षण ( अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींकरिता )

## प्रवेशित विद्यार्थिनी संख्या
## (२०१६-१७)

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | बी. कॉम. भाग १ | मराठी माध्यम<br>इंग्लिश माध्यम | ९९<br>११७ |
| 2. | बी. कॉम. भाग २ | मराठी माध्यम<br>इंग्लिश माध्यम | ४५<br>८२ |
| 3. | बी. कॉम. भाग ३ | मराठी माध्यम<br>इंग्लिश माध्यम | ३१<br>७२ |

•

## Result

| Class | Total | Pass | Fail | Total % |
|---|---|---|---|---|
| B. com. I (Eng) | 108 | 43 | 65 | 39.81 |
| B. Com. I (Mar) | 73 | 13 | 60 | 17.80 |
| B. com. II (Eng) | 77 | 40 | 37 | 51.94 |
| B. Com. II (Mar) | 40 | 13 | 27 | 32.50 |
| B. com. III (Eng) | 34 | 26 | 8 | 76.47 |
| B. Com. III (Mar) | 25 | 20 | 5 | 80 |

## Result Analysis (2015-16)

## मराठीव इंग्रजी माध्यम

60% पेक्षा अधिक गुण असलेल्या विद्यार्थिनींची

| वर्ग | विद्यार्थिनीसंख्या |
|---|---|
| बी कॉम Iमराठी | 3 |
| I इंग्रजी | 24 |
| बी कॉम IIमराठी | 11 |
| II इंग्रजी | 37 |
| बी कॉम III मराठी | 14 |
| III इंग्रजी | 24 |

# कार्यभार २०१६-१७. (Workload)

## मराठी माध्यम

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | कार्यभार (तासिका) |
|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. सुषमा देशमुख | 18 |
| 2. | प्रा. डॉ. शालिनी पांडे | 18 |
| 3. | प्रा. डॉ. अरुणा वाडेकर | 18 |
| | तासिका भार तत्त्वावरील प्राध्यापक | |
| 1. | प्रा. नयन मासोदकर | 7 |
| 2. | प्रा. बबिता सालोडकर | 7 |

## *इंग्रजीमाध्यम*

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | कार्यभार (तासिका) |
|---|---|---|
| 1. | प्रा. मंजुषा जाजू | 09 |
| 2. | प्रा. चंचल टाओरी | 10 |
| 3. | प्रा. केशव पंचारिया | 24 |
| 4. | प्रा. अनुराग काळे | 15 |

## 2.3.7 Collaboration

## महिला महाविद्यालय तसेच तक्षशिला महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राहक सरंक्षणावर'PPT सादरीकरण स्पर्धा संपन्न. (2016-17)

**प्रस्तावना-**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षणमंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालयामध्ये "ग्राहक संरक्षण" या विषयावर PPT सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**अध्यक्ष:** मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील.

**उदघाटक:** प्रा.डॉ.प्रकाश रोशन राव.

**आयोजक:** महिला महाविद्यालय व तक्षशिला महाविद्यालयाची वाणिज्य शाखा.

**परीक्षक:** 1) प्रा. डॉ. अंकुश गिरी,महिला महाविद्यालय,अमरावती.

2) प्रा.श्वेता सोळंकी, तक्षशिला महाविद्यालय, अमरावती.

**सहभाग:** महिला महाविद्यालय व तक्षशिला महाविद्यालयाच्यावाणिज्य शाखेतील बी कॉम भाग 1, 2, 3 चे विद्यार्थी.

**उद्देश :**

1)विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

२)आधुनिक तंत्रज्ञानाच्यावापराविषयी आत्मविश्वास निर्माण करणे.

३)दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विचारांची परस्परांशी देवाणघेवाण करणे.

# अहवाल

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालय व श्री दादासाहेब गवई चॅरिट्रेबल ट्रस्ट द्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेद्वारा "ग्राहक संरक्षण " या विषयावर PPTसादरीकरण स्पर्धेचे आयोजन महिला महाविद्यालयामध्ये करण्यात आले.

स्पर्धेचा उदघाटन कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटनपर भाषणात प्रा. डॉ. राव यांनी दोन्हीमहाविद्यालयातील वाणिज्य शाखेद्वारा संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रम अभिनंदास पात्र असल्याचे प्रतिवादन केले. "ग्राहक संरक्षणाचा" केवळ कायदा करून ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण होत नसून ग्राहकांनी आपले अधिकार व कर्तव्याविषयी नेहमीच जागरूक असणे आवश्यक आहे. या संदर्भास त्यांनी अनेक उदाहरणांची दाखले दिले. वस्तू खरेदी करते वेळी वास्तविकतेचे भान ठेवा, खोट्या जाहिरातील बळी पडू नका. असे आव्हाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ.अविनाश मोहरील यांनी हा कार्यक्रम नाविण्यपूर्ण असून एक नव्या चळवळीची सुरवात आहे असे प्रतिपादन केले. सादरीकरणाची संकल्पना हि कार्पोरेट सेक्टर मधील असून तिचा वापर आपण महाविद्यालयातील शिक्षण प्रणालीमध्ये करीत असल्याने हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले.संयुक्त विद्यमाने आयोजित आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर आधारीत हा कार्यक्रम शिक्षण प्रक्रियेतील एक महतवपूर्ण पाऊल आहे. "ग्राहक संरक्षणाचा " हा विषय केवळ वर्गात न शिकवता त्याचा प्रत्यक्ष जीवनामध्ये कसा वापर करावा याचे प्रात्यक्षिक ज्ञान देणारा हा कार्यक्रम आहे. नवीन विचार, प्रेरणा देणारा विषय स्पर्धेतून मांडला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.स्पर्धेमध्ये विजेत्या स्पर्धकांना समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. मोहरील यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. स्पर्धचे परीक्षण प्रा. डॉ. अंकुश गिरी व प्रा.श्वेता सोळंकी यांनी केले.

या स्पर्धेमध्ये महिला महाविद्यालय तसेच तक्षशिला महाविद्यालयातील एकूण ३० स्पर्धकांनी भाग घेतला. या स्पर्धेचे आयोजकांची संकल्पना प्रा. डॉ. शालिनी पांडे व प्रा. डॉ. किशोर आकोटकर यांचे असून या स्पर्धेच्या आयोजनामध्ये प्रा. विवेक ढोके, प्रा. पंचारिया, प्रा. काळे, प्रा मासोदकर, प्रा. सालोडकर, प्रा. सोळंकी, प्रा. जाजूयांचा महत्वपूर्ण सहभाग होता. कार्यक्रमाचे संचालण प्रा. बबिता सालोडकर यांनी तर आभार प्रदर्शन कु.

नेहर यांनी केले. कार्यक्रमाचे वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थीनीतसेच प्रा. डॉ. सुषमा देशमुख व प्रा. डॉ. वाडेकर यांची उपस्थिती लाभली.

**<u>फलनिष्पती</u> :-**

१. विद्यार्थिनींचा आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराविषयी न्यूनगंड दूर झाला.

२.या स्पर्धेत दोन्ही महाविद्यालयातील ३० स्पर्धक सहभागीझाले.

३.दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थिनींची परस्परांशी विचारांचीदेवाणघेवाण झाली.

४. ग्राहक संरक्षणाविषयी विद्यार्थिनींना माहिती प्राप्त झाली.

५. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थिनींनी केले.

६.या स्पर्धेचा लाभ उपस्थित १२५ विद्यार्थिनींना झाला.

परीक्षकांचे स्वागत करतांना प्रा. पंचारिया व प्रा. काळे.





कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थिनी.



PPT सादरीकरण स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी
संबोधित करताना उद्‌घाटक मा. डॉ. राव





अध्यक्षिय भाषण करतांना
मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील.



स्पर्धेमध्ये सादरीकरण करतांना
स्पर्धक



अध्यक्षिय भाषण करतांना मा.
प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील.



स्पर्धेमध्ये सादरीकरण करतांना
स्पर्धक



बक्षिस वितरण प्रसंगी मा. प्राचार्य . डॉ. अविनाश मोहरील
यांच्या हस्ते बक्षिसे स्वीकारताना
विजेते स्पर्धक





# स्पर्धेची आयोजन चमू.



# ग्राहक संरक्षणावर पीपीटी सादरीकरण

प्रतिनिधी | अमरावती

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालय तसेच श्री दादासाहेब गवई चॅरिट्रेबल ट्रस्ट द्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेद्वारा ग्राहक संरक्षण' या विषयावर पीपीटी सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली.

स्थानिक महिला महाविद्यालयात ही स्पर्धा घेण्यात आली. प्रास्ताविक प्रा. बबिता सालोडकर यांनी केले. स्पर्धेचा उद्‌घाटन कार्यक्रम प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अध्यक्ष प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील यांनी हा कार्यक्रम नाविण्यपूर्ण असून एक नव्या चळवळीची सुरवात असल्याचे प्रतिपादन केले. सादरीकरणाची संकल्पना ही कार्पोरेट सेक्टर मधील असून तिचा वापर आपण महाविद्यालयातील शिक्षण प्रणालीमध्ये करीत असल्याने हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. स्पर्धेमध्ये विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार प्राचार्य डॉ. मोहरील यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. अंकुश गिरी व प्रा. श्वेता सोळंकी यांनी केले. या स्पर्धेत महिला महाविद्यालय तसेच तक्षशिला महाविद्यालयातील बहुसंख्य स्पर्धकांनी भाग घेतला.

## तक्षशिला महाविद्यालय व महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ई-कॉमर्स व कॉमर्स वरीलआंतरमहाविद्यालयीनसेमिनार स्पर्धा

**(दिनांक - १०-१२-२०१६)**

**आयोजक**: तक्षशिला महाविद्यालय.

**अध्यक्ष**: मा. प्राचार्य डॉ. मल्लू पदवल

**उदघाटक**: वाणिज्य शाखेचे माजी अधिष्ठाता मा. प्रा. डॉ.शाम काळे.

**प्रमुख अतिथी** : मा. प्रा. डॉ. प्रकाश रोशन राव

**विशेष उपस्थिती**: १. मा. प्रा. डॉ. किशोरआकोटकर

२. मा. प्रा. डॉ. शालिनी पांडे

**उद्दिष्ट**:

१. विद्यार्थ्यांमध्ये संदेशवहन कौशल्य विकसित करणे.

२. वक्तृत्व कौशल्याचा विकास करणे.

३. संशोधनास प्रवृत्त करणे.

४. व्यासपीठ ध्येर्य निर्माण करणे.

**फलनिष्पत्ती:**

१. या स्पर्धेमध्येअमरावती शहरातील सर्वच महाविद्यालयाच्या वतीने ३३ स्पर्धक सहभागी झाले.

२. महिला महाविद्यालयातीलB.Com. II (Eng. Med.) मधील कु. राजश्री नेहरहिला व्दितीय क्रमांकाचे ३०० रु रोख व प्रमाणपत्रासह बक्षीस प्राप्त झाले.



तक्षशिला महाविद्यालयाच्या
व्यासपीठावर
उपस्थित मान्यवर

उदघाटनपर भाषण करताना माजी
अधिष्ठाता डॉ.शाम काळे.






सेमिनार सादर करताना
राजश्री नेहर

सेमिनार सादर करताना
धनश्री व्हाडे







विजेत्या स्पर्धकांसोबत
आयोजक

सहभागी स्पर्धक
आयोजकांसोबत



## 2.5.2 Student Progression

## Slow Learner & Advance Learner Student करिताExtra Coaching

Prof. Dr. ShaliniPande

### Extra Coaching for Slow Learner & Advance Learner Group

Time Table

| Class | Advanced Learner Group | Slow Learner Group |
|---|---|---|
| B.Com. II | CAT (Thursday) (3.55 to 4.15) | ITB (Monday) (3.55 to 4.15) |
| B.Com. III | CMA (Wednesday) (3.55 to 4.15) | IBS (Saturday) (11.55 to 12.20) |

B.Com I PBMया विषयकरिता मंगळवार रोजी दु. 3.05 - 3.55 पर्यंत अतिरिक्त तास घेऊन त्यांना Extra Coaching केल्या जात आहे.

## B.Com II CAT & ITB

## Slow Learner Group

४५% पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थिनींची यादी

| अ.क्र. | विद्यार्थिनींचे नाव | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | पल्लवी राऊत | | | | |
| २ | राणी विजयकर | | | | |
| ३ | रोहिणी निखारकर | | | | |
| ४ | सोनाली डेरे | | | | |

## Advance Learner Group

६५% पेक्षा अधिक गुण असलेल्या विद्यार्थिनी

| अ.क्र. | विद्यार्थिनींचे नाव | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | दुर्गा काळे | | | | |
| २ | सपना मट्ठे | | | | |
| ३ | योगिनी गडकरी | | | | |
| ४ | वृषाली नंदरधने | | | | |

- ६५% पेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थिनींकरिता अतिरिक्त तास घेऊन त्यांच्या अडचणी सोडविण्यात आलेत. तसेच अतिरिक्त अभ्यास पूरक साहित्य उपलब्ध करून दिले.
- ४५% पेक्षा कमी गुण प्राप्त विद्यार्थिनींकरिता अतिरिक्त तास घेऊन त्यांच्या अडचणी सोडविण्यातआल्यात.

## B.Com III CMA & IBS

## Slow Learner Group

६५% पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थिनींची यादी

| अ.क्र. | विद्यार्थिनींचे नाव | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अश्विनी पवार | | | | |
| २ | कल्याणी काळे | | | | |
| ३ | प्रतीक्षा घोटे | | | | |
| ४ | राजेश्वरी ठाकूर | | | | |
| ५ | श्वेता चांदुरे | | | | |

- वरील विद्यार्थिनी करिता अतिरिक्त तास घेण्यात येऊन त्यांच्या विषया संदर्भातील अडचणी सोडविण्यात आल्यात.

## Advance Learner Group

| अ.क्र. | विद्यार्थिनींचे नाव | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुश्री शिरभाते | | | | |
| २ | अर्चना शेरेकर | | | | |
| ३ | धनश्री वऱ्हाडे | | | | |
| ४ | कोमल बन | | | | |
| ५ | मिनल पछेल | | | | |
| ६ | निकिता गाडे | | | | |
| ७ | पल्लवी भेले | | | | |
| ८ | पूजा कोळसेकर | | | | |
| ९ | प्रतीक्षा आवारे | | | | |
| १० | रुचिता गाडे | | | | |
| ११ | शीतल वाटणे | | | | |
| १२ | स्नेहा देशमुख | | | | |
| १३ | श्वेता चांदुरे | | | | |
| १४ | वैष्णवी धंदर | | | | |

## 2.5.3 Student Participation and Activities

## वाणिज्य शाखेतील अभ्यासमंडळ उदघाटक सोहळा (2016-17)

### व्याख्यान

### विषय :- बदलती संस्कृती

### दि : २३/९/२०१६

**प्रस्तावना:**

शैक्षणिक सत्र २०१६-१७ मध्ये वाणिज्य शाखेतील अभ्यास मंडळाचे उदघाटक करण्याकरिता मा.प्रा. सौ. सुनीता इथापे यांना आमंत्रित करण्यात आले त्यांनी ' बदलती संस्कृती ' या विषयावर मार्गदर्शन केले.

**अध्यक्ष:** प्रा. डॉ. शालिनी पांडे

**उदघाटक:** प्रा.सौ सुनीता इथापे

**प्रमुख अतिथी:** प्रा. डॉ. अंकुश गिरी

**आयोजक:** वाणिज्य शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम)

**सहभाग:** बी कॉम मराठी व इंग्रजी माध्यम १,२,३ च्या विद्यार्थिनी

**उद्देश:**

1.अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विविध अभ्यास पूरक कार्यक्रमाचेआयोजन करणे.

2.विविध विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करून विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास साधणे.

3.विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनीच्या व्याक्तीमत्वाचा विकास घडवून आणणे.

# अहवाल

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासमंडळाचे उदघाटन मा.प्रा.सौ. सुनीता इथापे यांच्या हस्ते संपन्न झाले. उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अंकुश गिरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शालिनीपांडे यांनी केले. या प्रसंगी त्यांनी अभ्यासमंडळ गठण करण्याचा उद्देश स्पष्ट करून वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाचीमाहितीदिली.

उदघाटनपर भाषणातमा. प्रा. सौ सुनीता इथापे यांनी 'बदलती संस्कृती'यावर विद्यार्थिनींना उदबोधन केले. आलेल्या संधीचा वापर करा,उंचउडण्याचा विचार करा, मार्ग निश्चित सापडतो. पण हे सर्व करीत असतांना थोरा मोठयांचा आदर करणे विसरू नका. बदलत्या संस्कृतीच्या ओघात वाहत न जाता त्यामधील चांगल्या गोष्टीचा अंगीकार करा. युवा पिढी मध्ये जगाला हलवण्याची ताकद असते, या शक्तीचा वापर देशहितासाठी करा. नवीन तंत्रज्ञानाची कास धरा पण आपल्या संस्कृतीचे भान हरपू देऊ नका. एक चांगली व्यक्ती हजार वाईट व्यक्तीवर मात करू शकते. त्यामुळे चांगली व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करा. आज समाजामधून जीवन मूल्य लोप पावतांनादिसते, त्यामुळे शासनाला अभ्यासक्रमामध्ये मूल्य शिक्षणाची गरज भासू लागली. सुसंस्कृत समाज निर्माण करण्याची जबाबदारी आजच्या युवा पिढीवर आली आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. तुम्हीच हा देश घडवू शकता, नवीन निर्मितीची कास धरा असा मौलिक संदेश यांनी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. अंकुश गिरी यांनी जीवनामध्ये व्यक्तिमत्व विकासासाठी मूल्यशिक्षणाची तसेच अभ्यास मंडळद्वारा विविध उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. "सक्सेस के पिछे मत दौडो, काबील बनो,काबील बननेपर सक्सेस अपनेआपमिल जाता हे " त्यामुळे यशस्वी जीवन जगण्यासाठी आधी स्वतःला पात्र बनवा. त्याकरिता महाविद्यालयन जीवनातील काळ अत्यंत महत्वाचा आहे. "वक्त मिलता हें जिंदगी बदलने के लिए , लेकीन जिंदगी न मिले दोबारा वक्त बदलने के लिए ". असे महत्वपुर्ण विचार त्यांनी अध्यक्षिय भाषणातून विद्यार्थिनीं समोर ठेवले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ शालिनी पांडे, प्रा. पंचारिया , प्रा मासोदकर, प्रा. सालोडकर, तसेच विभागातील इतर तासिकाभार तत्त्वावरील प्राध्यापकांनी केले. कर्यक्रमाचे संचालन राजेश्री नेहर तर आभार प्रदर्शन धनश्री वऱ्हाडे हिने केले. कार्यक्रमात वाणिज्य शाखेतील प्रा. डॉ. वाडेकर तसेच इतर सहकारी प्राध्यपक व बहुसंख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**<u>फलनिष्पत्ती</u>:**

1.कार्यक्रमाचे आयोजन, संचालन व आभारप्रदर्शन विद्यार्थिनींनी केले.

2.विद्यार्थिनींनी बदलत्या संस्कृतीविषयी माहिती प्राप्त झाली.

व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



उद्घटकांचे स्वागत करतांना मा. प्रा. डॉ. अंकुश गिरी.



प्रमुख अतिथी  प्रा. डॉ. अंकुश गिरी
यांचे स्वागत करताना - धनश्री
वऱ्हाडे



अध्यक्षाचे स्वागत करताना
प्रा. डॉ.शालिनी पांडे



वाणिज्य  शाखेतील  अभ्यासमंडळ
उदघाटन कार्यक्रममध्ये
उद्घघाटक पर  भाषण करतांना
मा.  प्रा.   सौ. सुनीता इथापे.



अध्यक्षिय भाषण  करतांना
प्रा. डॉ अंकुश गिरी.



# विविध विभागांतर्गत प्रश्नमंजुषाकार्यक्रमाचे  आयोजन

## (Interdisciplinary Quiz Competition)

**प्रस्तावना:**

महिला महाविद्यायामध्ये वाणिज्यशाखा, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र वअर्थशास्त्र विभागांतर्गत दिनांक : ३०/११/२०१६ रोजी प्रश्नमंजुषाकार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आले.

**अध्यक्ष:**प्राचार्य.डॉ.अविनाश मोहरील.

**आयोजक :**वाणिज्यशाखा, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र विभाग.

**सहभाग:**वाणिज्यशाखा, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र विभागातीलविद्यार्थिनी.

**उद्दिष्टे :**

१.विद्यार्थिनींचा व्यक्तिमत्वाचा विकास साधणे.

२.विद्यार्थिनींमध्ये  अभ्यासपूरक साहित्य  वाचनाची आवडनिर्माण  करणे.

३.स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी.

**अहवाल**

वाणिज्यशाखा, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विभागांतर्गत प्रश्नमंजुषा कार्यक्रम आयोजन करण्यात आले. संचालन कु. राजश्री  नेहर हिने केले तर प्रास्ताविक  प्रा. मंजुषा धापूडकर यांनी केले.आजचे युग हे स्पर्धेचेयुग आहे त्यामुळे प्रत्येकविद्यार्थिनीनीस्पर्धेत उतरण्याची तयारी ठेवावी  कोणत्याही स्पर्धेत  यशस्वी होण्यासाठी उत्तम नियोजनवप्रयत्नांचेसात्यतअसणे आवश्यक  आहे याच हेतूनेप्रस्तुत कार्यक्रमाचेआयोजन करण्यात आले. याकार्यक्रमास  १८५ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. तर स्पर्धकम्हणून १५विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या, प्रश्नमंजुषा स्पर्धेत  वाणिज्यशाखा, भूगोल, इतिहास,

राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयाशीसंबंधितप्रश्न तसेच बुद्धिमत्ता चाचणी, सामान्य ज्ञानव मी कोण, ओळखापाहू अशा विविध फे यांचा समावेश होता.

स्पर्धेमध्ये कु. मोनाली पोकळे, शुभांगी गुल्हाने, शुभांगी पाताळवंशी, भाग्यश्री नेहर, भरती शेबे, या विद्यार्थिनींची चमु विजयी झाला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. हेमलता सोनटक्के, प्रा. प्रवीण गुल्हाने, डॉ. प्रा. शालिनी पांडे. यांनी केले.

बक्षिस वितरणकार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी विद्यार्थिनींना संबोधितकरतांना म्हटले कि विविध विभागांतर्गत घेण्यात येणार प्रश्नमंजुषा हा अभिनव उपक्रम असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींची स्पर्धपरिक्षेची पूर्वतयारी होईल. पणत्यासाठी विद्यार्थिनींनी विविध विषयांच्या अभ्यासामध्ये सात्यत ठेवून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी असे आव्हाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. शालिनी पांडे, प्रा. हेमलता सोनटक्के, प्रा.मंजुषा धापूडकर, प्रा.प्रवीण गुल्हाने, प्रा. सुभाष गोटफोडे, प्रा. नयन मासोदकर, प्रा. प्रवीण मातोडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. भाग्यश्री नेहर हिने केले.

<u>**फलनिष्पत्ती**</u>**:**

१.कार्यक्रमाचे सूत्रसंचालण विद्यार्थिनींनी केले.

२.विद्यार्थिनींनी विविध विविध विषयांच्या संदर्भात अभ्यासपूरक साहित्यांचे वाचनकेले.

३.कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थिनींची उपस्थित होत्या.

प्रश्नमंजुषा कार्यक्रमास उपस्थित मान्यवर



स्पर्धेमध्ये उपस्थित विद्यार्थिनींसह स्पर्धक विद्यार्थिनी



कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, विविध विभागातील विभाग प्रमुखांसह विजेत्या स्पर्धकांची चमू



# बक्षिस वितरण

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा. मंजुषा धापूडकर



अध्यक्षिय भाषण करतांना मा. प्राचार्य डॉ अविनाश मोहरील



बक्षिसाचे वितरण करतांना मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील.





## SEBI कडूनआर्थिकशिक्षणवजागृतीकार्यशाळा

## (२०जानेवारी, २०१६.)

**प्रस्तावना :**

वाणिज्य शाखेद्वारा विद्यार्थिनींमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्याच्या हेतूने भारतीय रोखे आणि विनिमय बोर्ड ( SEBI ) द्वारा " आर्थिक शिक्षण व जागृती " कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**अध्यक्ष:** मा.प्राचार्य. डॉ. अविनाशमोहरील.

**प्रमुखमार्गदर्शक :** मा. प्रा. डॉ. प्रशांतपिसोळकर.

विभागप्रमुख, शंकरलालखंडेलवालमहाविद्यालयअकोला.

**SEBI Empanelled financialresource person.**

**आयोजक :** वाणिज्यशाखा, इतिहासविभाग.

**लाभार्थी:** वाणिज्यशाखावइतिहासविभागाच्याविद्यार्थिनी.

**उद्देश :**

SEBI च्या आर्थिक साक्षरता अभियाना अंतर्गत महाविद्यालीयीन विद्यार्थीमध्ये आर्थिक साक्षरता तसेच आर्थिक नियोजनाची माहिती देणे.

**अहवाल**

'आर्थिक साक्षरता' अभियाना अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनीमध्ये आर्थिक जागृती निर्माण करण्याच्या हेतूने आर्थिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्था 'भारतीय रोखे आणि विनिमय बोर्ड'(SEBI) यांच्याद्वारे विद्यार्थिनींकरिता आर्थिक शिक्षण व जागृती कार्यशाळेचे आयोजक करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थिनींना आर्थिक नियोजन कसे करावे, योग्य गुंतवणूक कशी करावी, बचत आणि गुंतवणूक यातील फरक, गुंतवणुकीतील जोखिम व

परतावा याविषयी माहिती देण्यात आली. आज कॅशलेस व्यवहारातील महत्वपूर्ण साधने कोणती त्याचा वापर कसा करावायाची माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. प्राप्त माहिती विद्यार्थिनींना आपल्या पालकांपर्यंत पोहचविण्याचे आव्हान करण्यात आले. कार्यशाळेत शेयर मार्केट व म्युच्युअल फंड याची संकल्पना समजवून देण्यात आली. त्याचप्रमाणे गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची, दस्तऐवजांची माहिती देऊन 'SEBI' चे कार्य व भूमिका विषयी विद्यार्थिनींना अवगत करण्यात आले.

**फलनिष्पत्ती** :

१. विद्यार्थिनींनाआर्थिकनियोजनकसेकरावेयाचीमाहितीप्राप्तझाली.

२. डिजिटलट्रान्झेक्शनवकॅशलेसट्रान्झेक्शनचीमाहितीमिळाली.

३. गुंतवणूककरण्याकरिताआवश्यकदस्तऐवजांचीमाहितीमिळाली.

## आर्थिक शिक्षण व जागृती कार्यशाळा.



व्यासपिठावर उपस्थित मान्यवर



कार्यशाळेस उपस्थित विद्यार्थिनी.




मान्यवरांचा सत्कार करतांना
प्रा. डॉ. शालिनी पांडे.

कार्यशाळेचे संचालन करतांना
भाग्यश्री नेहर.



कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ. प्रशांत पिसोळकर.





आभार प्रदर्शन करतांना प्रा. मंजुषा धापूडकर.



## 2.5.1 Student Support

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर सेमिनारकार्यशाळेचे आयोजन

## स्पर्धा परीक्षा

## (दि. ७ सप्टेंबर २०१६.)

**प्रस्तावना:**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अंतर्गत महिला महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

**अध्यक्ष:** प्रा. डॉ. शालिनी पांडे.

**मार्गदर्शन:** प्रा. सूचित कुंभारकर.

संचालक ध्येय स्टडी ग्रुप.

ई-लर्निंग स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, अमरावती.

**आयोजक:** स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती.

**लाभार्थी:** महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी.

**उद्धेश:**

१. विद्यार्थिनींचा स्पर्धात्मक परीक्षेबद्दल आत्मविश्वास वाढविणे.

२. विद्यार्थिनींची बौद्धिक क्षमतेची वाढ होण्यास मदत करणे.

### अहवाल

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारासंचालित महिला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षामार्गदर्शन केंद्राअंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेची मूलभूत तयारी करवून देणे, स्पर्धात्मक परीक्षेबद्दल आत्मविश्वास वाढविणे. बौद्धिक क्षमतेची वाढ करण्यास मदत करणे हा होता. कार्यशाळेत मार्गदर्शक प्रा. सूचित कुंभारकर यांनी विविध स्पर्धा परीक्षेची विस्तृत माहिती दिली. विद्यार्थिनींमध्ये या परीक्षेबद्दल अनेक प्रश्न होते. ते प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या समस्यांचे निराकरण करण्यात

आले. हा उपक्रम स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्वयक प्रा. डॉ. शालिनी पांडे , प्रा. मंजुषा धापूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

<u>फलनिष्पती</u> :

१.विद्यार्थिनींमध्ये स्पर्धात्मक परीक्षेबद्दल आत्मविश्वास वाढला.

२.बौद्धिक क्षमतेची वाढ झाली.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारा आयोजित
सेमिनार मध्ये मार्गदर्शन करताना
प्रा. सूचित कुंभारकर.





## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे एक दिवसीय

## कार्यशाळेचे आयोजन

## दि : २६/०९/२०१६

**प्रस्तावना** :

नूतन विदर्भ शिक्षण मंडळा अंतर्गत महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

**कार्यशाळेचे अध्यक्ष:** मा. प्राचार्य. डॉ. अविनाश मोहरील.

**(उदघाटक)** महिला महाविदयालय ,अमरावती.

**स्पर्धा परीक्षाचे:** मा. प्रा. जयदीप देशमुख

**मार्गदर्शक :** स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुखमार्गदर्शक,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.

**आयोजक:** स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती

**लाभार्थी:** बी ए आणि बी कॉम अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी

**उद्देश:**

१. स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करून घेणे.

२. विद्यार्थिनींच्या जीवनात येणाऱ्या अनेक अडचणींना तोंड देण्यास समर्थ बनविणे.

३. विद्यार्थिनींच्या बौद्धिक क्षमतेची वाढ होण्यास मदत होते.

४. विद्यार्थिनींना आर्थिक दृष्ट्या सक्षमबनविणे व त्यांचा आत्मविश्वास वाढविणे.

# <u>अहवाल</u>

नूतन विदर्भ शिक्षण मंडळद्वारा संचालित महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षामार्गदर्शन केंद्र अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे उदघाटन सोहळा आयोजित करण्यातआला.त्या कार्यशाळेचे अध्यक्ष व उदघाटक मा. प्रा. अविनाश मोहरील यांनी आपल्याभाषणात आपल्या जीवनाचे ध्येय स्पर्धात्मक परीक्षा व ती पूर्ण करण्याची जिज्ञासाआपल्यामध्ये असावी.असे मत मांडले.सं. गा. बा. अमरावती विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख मा. प्रा.जयदीप देशमुख यांनी विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी.अभ्यासक्रमासाठी कोणत्या साहित्याचे वाचन करावे. त्याची कशी निवड करायची याचीमाहिती दिली.

**<u>फलनिष्पती</u> :**

१.विद्यार्थिनींच्या बौद्धिकक्षमतेची वाढ झाली.

२. विद्यार्थिनींचा आत्मविश्वास निर्माण करण्यात झाला.

३.स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करण्याविषयी मानसिकता तयार झाली

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राअंतर्गत
एक दिवसीय कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी उपस्थित
मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील,
मार्गदर्शक प्रा. जयदीप देशमुख.



विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना
मा. प्रा. जयदीप देशमुख.





# Industrial  Accountingवर सेमिनार आयोजन

**प्रमुख मार्गदर्शक**:   मा.श्री नंदकुमार  सोनी
संचालक, राधिका इन्फोटेक लि.अमरावती.

**लाभार्थी**:   B.Com.  I, II, III  तसेच B.A. III च्या विद्यर्थिनी.

**उद्देश  :**

१.विद्यार्थिनींना  Industrial  Accounting  ची माहिती देणे.

**फलनिष्पत्ती :**

१.विद्यार्थिनींना व्यवसाय, उद्योगमध्ये Industrial  Accounting चे महत्व कळले.

Industrial  Accounting वर मार्गदर्शन करताना चे
राधिका इन्फोटेक चे संचालक मा. नंदकुमार सोनी



# महिला महाविद्यालयामध्ये ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग वर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**प्रस्तावना**

महिला महाविद्यालयातील संगणक विभाग व वाणिज्य शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग वर वरिष्ठ महाविद्यलयातील विद्यार्थिनी करीता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि. २ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर, २०१६ या कालावधीमध्ये करण्यात आले.

**आयोजक** : १. वाणिज्य विभाग

२. संगणक विभाग

**लाभार्थी** : वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनी

**उद्देश** : १. ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग बद्दल जागरूकता निर्माण करणे.

२. कॅशलेस ट्रान्झेक्शन मध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध साधनांची माहिती देणे.

## अहवाल

शासनाने दि. ८ नोव्हेंबर, २०१६ रोजी ५०० रू व १००० रु च्या नोटबंदीचा निर्णय घेतला. त्यामुळे प्रत्येकच व्यक्तीला त्यामुळे निर्माण झालेल्या समस्येला सामोरे जावे लागले. कारण प्रत्यक्ष व्यवहारात चलन वापरामध्ये ५०० रु व १०००रुपयाच्या च्या नोटा बंद झाल्याने व्यवहार करताना अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्याला पर्याय कॅशलेस ट्रान्झेक्शनहा होता.परंतु त्याबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे नितांत आवश्यक होते. याच उद्देशाने महाविद्यालयातील संगणक विभाग व वाणिज्य शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग या विषयावर सर्व विद्यार्थिनींना प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थिनींना ई-बँकिंग व मोबाईल बँकिंगची संकल्पना, त्याचा उपयोग, तसेच ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग चा वापर करताना घ्यावयाची काळजी, कॅशलेस ट्रान्झेक्शन मध्ये वापरण्यात येणारी विविध साधने यावर सविस्तर मार्गदर्शन करून त्यावर चर्चा करण्यात आली.याकरिता प्रा. डॉ.शालिनी पांडे, प्रा. मंजुषा धापूडकर, प्रा. पंचारिया, प्रा. काळे, प्रा. मासोदकर, प्रा. सालोडकर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रशिक्षकाचे मुख्य कार्य प्रा. पंचारिया व प्रा. काळे यांनी केले.

**फलनिष्पत्ती**:

१. सदर प्रशिक्षण वर्गाचा लाभ ३१५ विद्यार्थिनींनी घेतला.

२. विद्यार्थिनींना ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग ची संकल्पना समजली.

३. कॅशलेस ट्रान्झेक्शन मध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध साधनांविषयी जागरूकता निर्माण झाली.तसेच त्याच्या वापराबद्दलचे गैसमज दूर झाले.



प्रशिक्षणाविषयी माहिती देताना
प्रा. डॉ. शालिनी पांडे



# प्रशिक्षणाला उपस्थित विद्यार्थिनी









ई-बँकिंग व मोबाईल बँकिंग वर प्रशिक्षण देताना प्रा. पंचारिया व प्रा. काळे



# मुलाखत तंत्र व परिचय पत्र यावर एकदिवसीय कार्यशाळा

## (Interview Technique & Resume Making)

## (दिनांक : १६ डिसेंबर, २०१६.)

**प्रस्तावना** :

Commerce Faculty, Placement Cell, वHistory Department यांच्या संयुक्त विद्यमाने Interview Technique & Resume Makingवर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी आयोजित करण्यात आली.

**प्रमुख मार्गदर्शक** : श्री सूचित कुंभारकर
`
समुपदेशक, करिअर कौन्सिलिंग सेल,
सं.गा. बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**संचालन** : प्रा. मंजुषा धापूडकर

**प्रास्ताविक**: प्रा. डॉ. शालिनी पांडे

**आभार** : प्रा. जयश्री पोकळे

**आयोजक**: वाणिज्य शाखा
Placement Cell
इतिहास विभाग

**लाभार्थी** : B.Com. तसेच B.A. च्या सर्व विद्यार्थिनी

**उद्दिष्ट**:

१. मुलाखत तंत्र व परिचय पत्र या विषयीविद्यार्थिनींना माहिती देणे.

२. आत्म विश्वास निर्माण करणे.

### अहवाल

महिला महाविद्यालयातील संगणक विभाग, वाणिज्य विभाग, व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय Interview Technique & Resume Making या विषयावर दिनांक १६ डिसेंबर, २०१६. रोजीकार्यशाळा आयोजित करण्यात आली.

एखाद्या कंपनी मध्ये किंवा शैक्षणिक क्षेत्रात नोकरी करण्यासाठी resume बघितला जातो. त्यावर प्रथम निवड केली जाते. तो कसा तयार करायचा, त्यात उद्दिष्ट, शैक्षणिक पात्रता, त्याचा नमुना कसा असावा याबद्दल श्री. सूचित कुंभारकर यांनी मार्गदर्शन केले.

Interviewकशाप्रकारे द्यायचा, त्याचे मुख्य मुद्दे विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक स्वरूपात वPPT Videoद्वारा विद्यार्थिनींना दाखविले. विद्यार्थिनींची प्रत्यक्षात मुलाखत घेतली. व ती कशी द्यायची यावर मार्गदर्शन करण्यात आले.

<u>फलनिष्पती</u> :

१.सदर कार्यशाळेमध्ये एकूण ५६ विद्यार्थिनी सहभागी झाल्यात.

२. विद्यार्थिनींना मुलाखत तंत्राविषयी माहिती प्राप्त झाली.

३. विद्यार्थिनींनी स्वतःचे परिचय पत्र तयार केले.

व्यासपीठावर उपस्थित मान्यवर



कार्यशाळेस सहभागी विद्यार्थिनी






# Resume Making वर मार्गदर्शन करताना
# श्री. सूचित कुंभारकर







## महिला महाविद्यालयामध्ये मुलाखत तंत्रावर कार्यशाळा

### विद्यार्थिनींना परिचयपत्र तयार करण्याबाबत केले मार्गदर्शन



महिला महाविद्यालयात आयोजित मुलाखत तंत्रावरील कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थिनी.

**प्रतिनिधी । अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालयातील संगणक विभाग, वाणिज्य शाखा व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुलाखत तंत्र आणि परिचय पत्र तयार करणे या विषयावर शुक्रवार १६ डिसेंबरला कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. शालिनी पांडे होत्या. मार्गदर्शक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ करिअर कौन्सिलिंग सेलचे समुपदेशक सुचित कुंभारकर उपस्थित होते. प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. शालिनी पांडे यांनी विद्यार्थिनींना शैक्षणिक क्षेत्रात मुलाखत तंत्र आणि परिचय पत्राच्या महत्वाबाबत माहिती दिली. पहिल्या सत्रात सुचित कुंभारकर यांनी कंपनीमध्ये किंवा शैक्षणिक क्षेत्रात नोकरी करण्यासाठी परियच पत्र बघितला जाते. त्यावर विद्यार्थ्यांची प्रथम निवड केली जाते. परिचय पत्र कसे तयार करायचे, आपले उद्धिष्ट, शैक्षणिक पात्रता, त्याचा नमुना, कसा असावा याबद्दल विद्यार्थिनींना माहिती दिली. विद्यार्थिनींच्या मनात असलेल्या समस्या प्रश्नं स्वरूपात विचारून त्याचे निराकरण केले. अनेक विद्यार्थिनी उपस्थित तज्ज्ञांना मुलाखतीचे तंत्र आणि मंत्र कसे असेल, मुलाखतीची तयारी कशी करावी इथपासून ते मुलाखत होईपर्यंत उमेदवाराचे वर्तन कसे असावे, याविषयी प्रश्न विचारले. दुसऱ्या सत्रात कुंभारकर यांनी मुलाखत तंत्र विषयावर चर्चा केली. मुलाखत कशाप्रकारे द्यायचा, त्याचे मुख्य मुद्दे विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक स्वरूपात व पीपीटी, व्हिडीओद्वारे समजावून सांगितले. विद्यार्थिनींची प्रत्यक्षात मुलाखत घेण्यात आली. या कार्यशाळेत उपस्थित उमेदवारांमध्ये बीकॉम व बीए च्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यशाळेत प्रा. मासोदकर, प्रा. सालोडकर उपस्थित होत्या. कार्यशाळेचे आयोजन संगणक विभागातील. प्रा. डॉ .शालिनी पांडे, प्रा. मंजुषा धापूडकर, प्रा. जयश्री पोकळे, कु. प्राजक्ता शामतकर, कु. कोमल पाटील यांनी केले. संचालन प्रा. मंजुषा धापूडकर यांनी केले तर आभार प्रा. जयश्री पोकळे यांनी मानले.

## सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन

## (दिनांक :६ जाने, २०१७.)

**प्रस्तावना :**

वाणिज्य शाखा, इतिहास विभाग,व स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

**परीक्षक:** प्रा. जयवंत पराते.

` (इंग्रजी विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, अमरावती.)

**आयोजक** १.वाणिज्य विभाग

२.इतिहास विभाग

३. स्पर्धा परीक्षा केंद्र

**लाभार्थी :** B. A.तसेच B.Com. च्या सर्व विद्यार्थिनी

**उद्दिष्ट :** १ स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणे .

२. सामान्य ज्ञान तपासणे.

३. वाचनाची गोडी निर्माण करणे.

४. ज्ञानाचा स्तर उंचावणे.

**अहवाल**

B.Com.भाग १,२,३ च्या विद्यार्थिनींना दररोज वर्तमानपत्रे वाचून जगामध्ये काय चालू आहे या बातम्या नोंदी आपल्या वहीमध्ये घेऊन वर्गामध्ये वाचून दाखवितात. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी याच चालू घडामोडींवर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन दिनांक ०६ जानेवारी, २०१७ रोजी करण्यात आले.परीक्षा ५० गुणांची ठेवण्यात आली. परीक्षेचे

मूल्यांकन प्रा. जयवंत पराते यांनी केले. मूल्यांकनाद्वारे प्रथम, द्वितीय व तृतीय असे क्रमांक देण्यात आले.

प्रथम क्रमांक - ९ विद्यार्थिनी

द्वितीय क्रमांक - ११ विद्यार्थिनी

तृतीय क्रमांक - ९ विद्यार्थिनी

विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

**<u>फलनिष्पत्ती</u>** :

१. विद्यार्थ्यांच्या ज्ञानांत भर पडली.

२. स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करण्यास मदत झाली.

३. आत्मविश्वास वाढला.



सामान्य ज्ञान परिक्षेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी

सामान्य ज्ञान परिक्षेत नोंदणी करतांना विद्यार्थिनी



## सामान्य ज्ञान परीक्षेचे पर्यविक्षण करताना
## प्रा. डॉ. शालिनी पांडे
## प्रा. मंजुषा धापूडकर





## सामान्य ज्ञान परीक्षेचे बक्षीस वितरित करताना मान्यवर







# अभ्यासमंडळ समारोपीय कार्यक्रम
# (करिअर कौन्सिलिंग)
# दिनांक :११/०२/२०१७.

**प्रस्तावना** :

वाणिज्य शाखेतील अभ्यासमंडळाच्या समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.समारोपीय कार्यक्रमामध्ये विद्यार्थिनींना करिअर च्या विविध क्षेत्रातील संधीबद्दल माहिती देण्यात आली.

**अध्यक्ष** : प्रा. डॉ. शालिनी पांडे

**प्रमुख अतिथी** : प्रा. आर. बी. पाटील

(विद्याभारती महाविद्यालय MCM Dept.)

**मार्गदर्शक** : प्रा. ए. आर. जाधव

(विद्याभारती महाविद्यालय MCM Dept.)

प्रा. जी. टी. खत्री

(विद्याभारती महाविद्यालय MBA Dept.)

**उद्देश** : विद्यार्थिनींना पदव्युत्तर विविध अभ्यासक्रमांची माहिती देणे.

**आयोजक** : वाणिज्य शाखा

**लाभार्थी** : वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थिनी

## अहवाल

वाणिज्य शाखेतील सर्व अभ्यासमंडळाच्या समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये वर्षभरामध्ये वाणिज्य शाखेद्वारा घेण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.त्याचप्रमाणे विद्याभारती महाविद्यालयाच्या MCM व MBA विभागातर्फेकरिअर कौन्सिलिंगकरण्यात आले. पदव्युत्तर विविध अभ्यासक्रमांची माहिती या कार्यक्रमांमध्ये देण्यात आली. वाणिज्य शाखेअंतर्गत सामान्य ज्ञान स्पर्धा व स्क्रॅपबुक प्रोजेक्ट या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले.

**फलनिष्पत्ती** :

विद्यार्थिनींना पदव्युत्तरविविध अभ्यासक्रमांची माहित सदर कार्यक्रम प्राप्त झाली.

माान्यवरांचे स्वागत करतानाप्रा. डॉ. शालिनीपांडे




**कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थिनी**





मार्गदर्शन करताना प्रा.ए.आर. जाधव
(विद्याभारती महाविद्यालय MCM Dept.)




मार्गदर्शन करतानाप्रा. जी. टी. खत्री
(विद्याभारती महाविद्यालय MBA Dept.)




मार्गदर्शन करतानाप्रा. आर. बी. पाटील
(विद्याभारती महाविद्यालय MCM Dept.)



## 2.7 Innovation & Best Practice

## Scrap Book Project

## ( अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींकरिता )

## विषय :- भारतीय अधिकोषण प्रणाली

**प्रस्तावना :**

वाणिज्य शाखेतील विद्यार्थीनीना बँकिंग व्यवहाराशी संबधित सर्वच महत्वपूर्ण कागदपत्रांची हाताळणी योग्यरित्या करता येणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेमध्ये बँकाची महत्वपूर्ण भूमिका असल्याने त्यासंदर्भात होणाऱ्या दैनंदिन घडामोडी ह्या वृत्तपत्रामध्ये बातम्यांद्वारे प्रकाशीत होत असतात. त्याची माहिती विद्यार्थीनीना व्हावी या दृष्टीने SCRAP BOOK PROJECT राबविण्याचा हेतू असतो .

**उद्देश :**

- विद्यार्थीनिनी बँकेच्या दस्तऐवजाची हाताळणी करणे. (Withdraw slip , deposit slip, बँक खातेउघडण्याचा फॉर्म भरणे , Bearar cheque ,account paycheque भरणे, इ.)
- डेबिट कार्ड , क्रेडीट कार्डचे प्रत्यक्ष अवलोकन .
- बँकच्या ठेवीदारांसाठी असणाऱ्या विविध योजना व कर्जविषयक योजनांची माहिती घेणे.
- बँकिग संदर्भातील दैनंदिन घडामोडींची माहिती मिळविणे.

## अहवाल

बी कॉम ३ च्या विद्यार्थीनीना 'भारतीय बँकिंग पद्धती' हा विषय अभ्यासक्रमाला आहे. या विषयाच्या संदर्भातील अभ्यासक्रम वर्षभर वर्गामध्ये शिकविण्यात येतो. विद्यार्थीनीना बँक व्यवहाराचे प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त व्हावे या उदेशाने हा प्रकल्प दरवर्षी घेण्यात येतो.

या प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थिनी बँके मधुन ,deposit slip , withdrawal slip, बँकखाते उघडायचे फॉर्म , ठेवीदारांसाठी असणाऱ्या विविध योजना तसेच कर्जविषयक योजनांचे माहितीपत्र बँके मधून मिळवितात. तसेच डेबिट कार्ड , क्रेडीट कार्ड , धनादेश या संदर्भात कागदपत्रे गोळा करतात . तसेच वर्तमान पत्रामध्ये बँकेच्या संदर्भातील असणाऱ्या बातम्या वाचणे व त्याचे कात्रण गोळा करून हि सर्व माहिती एका वहीमध्ये लावण्यात येते. अश्याप्रकारे हा प्रकल्प वर्षभर राबविण्यात येतो.

**<u>फलनिष्पत्ती</u> :**

- विद्यार्थीनीना बँकेच्या व्यवहाराच्या कागदपत्रांची प्रत्यक्ष हाताळणी करता आली .
- देशामधील बँक क्षेत्रातील घडामोडींची माहिती त्यांना बातम्यांच्या माध्यमातून प्राप्त झाली.
- बँकेद्वारे ग्राहकांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती प्राप्त झाली येते.
- बँक व्यवहाराविषयी असणारे अज्ञान दूर होऊन त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली .

# Photographs of Scrap Book Project



## Scrap Book Submitted By Students





## News on Current issues of Banking





Collection of Documents of Banking Transaction

Collection of various schems Brouchers for Customers.





# Scrap Book Project






## स्क्रॅपबुक चे निरीक्षण करताना मान्यवर



## Scrap Book सादर करताना विद्यार्थिनी





## उत्कृष्ट Scrap Book तयार करणाऱ्या गटाला बक्षीस वितरित करताना मान्यवर









# Training Program & Job Opportunity

## एल. आय. सी. व म्युच्युअल फंड गुंतवणूक अभिकर्ते प्रशिक्षण वर्ग

## (अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींकरिता)

**प्रस्तावना:**

वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनींना एल आय सी अभिकर्ते या क्षेत्रात रोजगाराच्या संधीची माहिती व प्रशिक्षण देण्यासाठी दिनांक २३ ते २७ जानेवारी २०१७ या कालावधी मध्ये प्रशिक्षण वर्गाचे आयोजन अंतिम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थिनींकरिता करण्यात आले.

**मार्गदर्शन:** मा. सौ. प्रतीक्षा मुंधडा

**आयोजक :** वाणिज्य शाखा

**लाभार्थी :** वाणिज्य शाखेतील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी

**उद्देश:**

१. विद्यार्थिनींना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने एल आय सी अभिकर्ते या क्षेत्रात रोजगाराच्या संधीची माहिती व प्रशिक्षण देणे.

**अहवाल**

वाणिज्य शाखेद्वारा अंतिम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थिनींकरिता एल आय सी अभिकर्ते माहिती व प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दिनांक २३ जानेवारी ते २७ जानेवारी या कालावधी मध्ये करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण वर्गाला एल आय सी व म्युच्युअल फंडाच्या आर्थिक सल्लगार मा सौ प्रतीक्षा मुंधडा यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यामागील हेतू वाणिज्य शाखेच्या प्रा. डॉ. शालिनी पांडे यांनी स्पष्ट केला. प्रास्ताविककु. रुचितागादेहिनेकेले.

प्रशिक्षण कार्यक्रमांच्या पहिल्या दिवशीविम्याचेमानवीजीवनातीलमहत्व, एल . आय. सी. चेराष्ट्रीयीकरण, एल.आल. सी. चेस्थापनाअशामूलभूतविषयांवरविद्यार्थिनींनामाहितीदेण्यातअली.

प्रशिक्षणाच्यादुसऱ्यादिवशीविमापॉलिशीचेविविधप्रकारचीमाहितीविद्यार्थिनींनादेऊन त्यावरचर्चाकरण्यातआली. त्याप्रमाणेएल.आय.सी. च्यापॉलिसिचाप्रीमियमकसाकाढावायासंदर्भातविद्यार्थिनींनामार्गदर्शनकरण्यातआले.

प्रशिक्षणाच्यातिसऱ्यावचौथ्यादिवशीएल.आय.सी. चेअभिकर्ते बनण्यासाठी आवश्यक पात्रता, माहिती, योग्यता काय असावीत्याचप्रमाणेअनेककायदेशीरबाबींविषयीविद्यार्थिनींनामार्गदर्शनकरण्यातआले. प्रशिक्षणाच्याशेवटच्याटप्प्यातविद्यार्थिनींनाआपल्याशंकाचेनिराक्षणकरूनघेतले.

वाणिज्यशाखेतीलअंतिमवर्षालाअसणाऱ्याविद्यार्थिनींकरिताइतकेमोलाचेप्रशिक्षणदिल्याबद्दल सौ.प्रतीक्षामुंधडायांचेआभारबी.कॉमविद्यार्थिनींनीकु.धनश्रीवऱ्हाडेहिनेमानले.

<u>**फलनिष्पत्ती**</u>**:**

१) विद्यार्थिनींनाएल.आय. सी.वम्युच्युअलफंडयासंदर्भातमूलभूतमाहितीप्राप्तझाली.

२) एल.आय.सीअभिकर्तेबनण्याकरिताआवश्यकपात्रतावयोग्यतायाविषयीमाहितीप्राप्तझाली.



प्रशिक्षकमा. सौ. प्रतिक्षा मुंधडा
यांचे स्वागत करतांना
प्रा. डॉ. शालिनी पांडे.

प्रशिक्षण वर्गाच्या उद्देशाविषयी माहिती
देतांनाबी. कॉम. ची
विद्यार्थिनी कु.निकिता गाडे.




एल आय सी अभिकर्ते व माहिती प्रशिक्षण वर्ग.



प्रशिक्षणाच्या तिसऱ्या दिवशी विषय
परिचय करून देतांना
प्रा. डॉ. शालिनी पांडे



प्रशिक्षण देतांना
मा. सौ. प्रतीक्षा मुंधडा



प्रशिक्षणार्थी कु. धनश्री वऱ्हाडे
आपल्या शंकांचे निराकरण
करून घेताना



प्रशिक्षणार्थी संवाद

